
साप्ताहिक
# गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24




* वर्ष २५ वे * अंक ४८ * सोमवार २५/११/२०२४ * डाक २७/११/२०२४ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 48 * monday : 25 / 11 / 2024 * post Dt. 27/ 11 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.

## गत महिनाभरात ७५०हून अधिक रूग्णांवर फेको शस्त्रक्रिया

### डॉ.उल्हास पाटील रूग्णालयाच्या नेत्रालयातील तज्ज्ञांचे यश



**जळगाव - येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात गत महिनाभरात ७५० हून अधिक रूग्णांवर मोतिबींदूच्या फेको शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या हभप जगन्नाथ महाराज अंजाळेकर नेत्रालयातर्फे प्रत्येक महिन्याला शेकडो रूग्णांच्या डोळ्यांची मोफत तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून केली जाते. तसेच ग्रामीण भागात सुरू असलेल्या आरोग्य शिबीरांच्या माध्यमातूनही मोतिबींदूचे रूग्णांना शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात येतो. सामाजिक दायित्व म्हणून डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या नेत्रालयातर्फे जळगाव आणि विदर्भातील नेत्रविकार असलेल्या रूग्णांसाठी आरोग्य शिबीरांच्या माध्यमातून तपासणी करून त्यांना उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. गत महिनाभरात डॉ. उल्हास पाटील रूग्णालयच्या नेत्रालयातर्फे ७५० हून अधिक रूग्णांवर मोतिबींदूच्या फेको शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत. या शस्त्रक्रियेसाठी विभागप्रमुख डॉ. एन.एस. आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नि.तु. पाटील, डॉ. निखील चौधरी यांची टीम कार्यरत आहे. तरी ग्रामीण भागासह विदर्भातील ज्या रूग्णांना डोळ्याशी संबंधित काही समस्या असतील त्यांनी तातडीने डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या नेत्रालयात संपर्क साधावा असे आवाहन रूग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## महिलेच्या पित्ताशयातील खडे दुर्बिणीद्वारे काढण्याची शस्त्रक्रिया

### डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील शल्यचिकीत्सकांचे यश

**जळगाव - भुसावळ तालुक्यातील एका ४० वर्षीय महिलेच्या पित्ताशयातून तब्बल ५० ते ६० खडे दुर्बिणीद्वारे काढण्यात शल्यचिकीत्सकांना यश आले आहे. या शस्त्रक्रियेमुळे महिलेची प्रकृती आता पुर्वीप्रमाणे ठणठणीत झाली आहे.**



याबाबत माहिती अशी की, गेल्या काही दिवसांपासून सयान बी फारूक (वय ४०) या महिलेच्या पोटात सातत्याने दुखत होते. हा त्रास असह्य झाल्याने त्यांना डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले. याठिकाणी शल्यचिकीत्सा विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शल्यचिकीत्सक डॉ. चैतन्य पाटील यांनी महिलेची तपासणी केली. तपासणी अंती पित्ताशयात खडे असल्याचे निदान करण्यात आले. त्यानंतर रूग्णावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. महिलेच्या पित्ताशयातील खडे काढण्यासाठी लॅप्रोस्कोपीक कोलेसिस्टोटोमी ही शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे करण्यात येऊन महिलेच्या पित्ताशयातून खडे काढण्यात आले. तसेच रूग्णाला यापुर्वी हर्निया देखिल झालेला असल्याने लॅप्रोस्कोपीक कोलेसिस्टोटोमी विथ इनसिझन हर्निया ही शस्त्रक्रिया देखिल करण्यात आली.

या शस्त्रक्रियेमुळे महिला रूग्णाचा पोटदुखीचा त्रास दूर झाला. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. चैतन्य पाटील यांना डॉ. किरण, डॉ. वैभव फरके, डॉ. बी.आर. सोनवणे यांचे सहकार्य लाभले.

## श्वास घेण्यास त्रास होतोय, वेळीच सावधगिरी बाळगा

### डॉ.उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा घ्या सल्ला

**जळगाव - ब्राँकायटिस ही एक श्वसन समस्या आहे ज्यामध्ये ब्रोन्कियल ट्यूब्स सूजतात. या नळ्या फुफ्फुसांना हवा पुरवण्याचे काम करतात. या नळ्या फुगल्या की श्वास घेण्यास त्रास होतो, कोरडा खोकला, कफ असलेला खोकला आणि छातीत दुखू शकते. तेव्हा अशा परिस्थीतीत त्वरीत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**



एक्यूट ब्रोंकाइटिसह अचानक, तात्पुरते आणि सहसा एक किंवा दोन आठवडे टिकते. बहुतेकदा हे सर्दी किंवा फ्लूच्या संसर्गामुळे होते.

**क्रॉनिक ब्रॉन्कायटिस:** हा एक दीर्घकालीन आजार आहे आणि त्याचे मुख्य कारण म्हणजे धुम्रपान किंवा प्रदूषित हवेचा संपर्क. हा एक प्रकारचा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) चा भाग आहे.

**ब्राँकायटिसची लक्षणे**

सतत खोकला आणि कफ होणे , श्वास घेण्यात अडचण होणे, छातीत घट्टपणा किंवा वेदना होणे, ताप आणि थंडी वाजून येणे, थकवा आणि अशक्तपणा जाणवणे, घसा खवखवणे अशी लक्षणे आढळून आल्यास त्वरीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

## गर्भाशय पिशवीत वाढलेल्या गाठीकडे दूर्लक्ष नको

**जळगाव - महिलांच्या पोटातील गर्भाशय पिशवीत वाढलेल्या दुर्मीळ गाठींवर ब्रॉड लिगामेंट फायब्रॉइड डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि स्त्रीरोग तज्ज्ञांच्या मदतीने गर्भाशय पिशवीतिल दुर्मीळ गाठींची जटील शस्त्रक्रिया होतात यशस्वी**

स्त्रीरोग विभाग प्रमुख तज्ज्ञ डॉ. माया आर्विकर यांच्या मतानुसार प्राथमिक तपासणी केल्यानंतर ब याच महिला रुग्णांच्या पोटात गाठ असल्याचे दिसून आल्यास त्यांच्या पोटाची सोनोग्राफी व सिटीस्कॅन केला जातो यातूनच गर्भाशय पिशवीत गाठ कीती मोठी व धोकादाय असल्याचे निदान होते. अशा प्रकारची गाठ अधिक काळ पोटात राहाणे धोक्याचे असल्याने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला जातो. सर्वसाधारणपणे हार्मोन्सचे प्रमाण कमी-जास्त झाल्याने अनेक महिला रुग्णांच्या गर्भाशयात गाठ अढळते. अशा गाठींची शस्त्रक्रिया करताना मुत्राशय पिशवी, मुत्र नलिका, लहान आतडे यांना इजा होण्याची शक्यता असते. गर्भाशय पिशवीत वाढलेल्या गाठीकडे दुर्लक्ष केल्यास कालांतराने या गाठीचे कर्करोगात रुपांतर होऊ शकते. तशी लक्षणे दिसून आल्यास महिलांनी दुर्लक्ष न करता तात्काळ उचार घ्यावेत असे आवाहन स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. यांनी केले आहे.

# आम्ही निभावले राष्ट्रीय कर्तव्य



जळगाव - विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया सुरू झाली असून सकाळीच रावेर तालुक्यातील विवरा येथील मतदान केंद्रावर जाऊन माजी खासदार डॉ उल्हास पाटील यांच्यासह कुटुंबियांसमवेत मतदान केले.

या प्रसंगी गोदावरी आजी यांनी वयाच्या ९१ व्या वर्षीही विवरे येथील मतदान केंद्रावर जावून मतदान करुन तरुणांना मतदानाचे आवाहन केले. यावेळी डॉ वर्षा पाटील, डॉ केतकीताई पाटील, डॉ वैभव पाटील, डॉ अनिकेत पाटील, डॉ अक्षता पाटील उपस्थित होते. तसेच डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी देखील मतदानामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेत मतदानाचा हक्क बजावला. वैद्यकीय महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. एन. एस. आर्विकर, डॉ. माया आर्विकर, रजिष्ट्रार प्रमोद भिरुड, नर्सिंगचे प्रविण कोल्हे यांनी विद्यार्थ्यांसोबत मतदानाचे पवित्र कार्य पार पाडले.





## संपादकीय

# लाडकी बहिण-परिवर्तनशील उपक्रम

महाराष्ट्राची लाडकी बहीण योजना ही महिलांना फक्त आर्थिक सहाय्य देणारीच योजना नाही, तर तो राज्यभरातील महिलांच्या जीवनाला आकार देणारा हा एक परिवर्तनशील उपक्रम आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने सुरू केलेली ही योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मासिक पैसे देते, ज्यामुळे महिलांना उद्योजक बनण्यासाठी उद्युक्त करते तसेच आर्थिक साक्षरता निर्माण करण्यास सक्षम करते. बऱ्याचदा मोफत म्हणून नाकारल्या जाणाऱ्या पारंपरिक कल्याणकारी उपाययोजनांप्रमाणे, ही योजना दरमहा १,५०० देणारी नाही, तर ती महिलांना आर्थिक अडथळे दूर करण्यासाठी आणि त्यांच्यात आत्मनिर्भरता निर्माण करणारी आहे. पुन्हा सत्तेत आल्यानंतर हीच रक्कम २,१००पर्यंत वाढवण्याचा सरकारचा मानस आहे. महाराष्ट्रातील २.६ कोटींहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ झाला असून यामुळे अनेकांनी त्यांच्या उद्योजकतेच्या प्रवासाला सुरुवात केली आहे. त्यामुळे हा जगातील सर्वात मोठा मायक्रोफायनान्स उपक्रम बनला आहे. आर्थिक स्वातंत्र्याचा मार्ग लाडकी बहीण योजनेमुळे महिलांसाठी एक सातत्यपूर्ण उत्पन्न निर्माण झाले आहे. त्याचा वापर महिला लहान व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा विस्तार करण्यासाठी करू शकतात. शिवणकाम, लहान किरकोळ सामानांची दुकाने आणि अन्नप्रक्रिया यांसारख्या उपक्रमांसाठी बीज भांडवल म्हणून याचा उपयोग होत आहे. २,१००पर्यंत होणारी प्रस्तावित वाढ महाराष्ट्रातील महिला उद्योजकांना आणखी मदत करू शकते. त्यामुळे त्यांना आर्थिक स्वायत्तता आणि आत्मविश्वास प्राप्त करण्यास मदत होईल. याबाबत खान्देशातील सुशीला शिंदे सांगतात की, या योजनेमुळे मी माझ्या शिवणकामाच्या यंत्राची दुरुस्ती करू शकले आणि एक लहान शिवणकाम व्यवसाय सुरू करण्यासाठी यंत्रसामग्री खरेदी करू शकले. मला आता कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नाही. मी माझ्या कुटुंबासाठीही कमावते. आर्थिक साक्षरता आणि आत्मविश्वास वाढवणे या योजनेसाठी आधारशी बँक खाते जोडणे आवश्यक असल्याने महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेस चालना मिळत आहे. ज्यांच्याकडे बँक खाते नव्हते अशा अनेकांना आता बचत, गुंतवणूक आणि मूलभूत हिशेब राखणे, व्यवसाय व्यवस्थापित करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये समजू लागली आहेत. महिलांच्या आर्थिक आकांक्षांमध्ये सांस्कृतिक बदल घडवून आर्थिक पाठिंब्याच्या पलीकडे, ही योजना महिलांना स्वतःला आर्थिक योगदानकर्ते म्हणून पाहण्याची प्रेरणा देत आहे. त्यांच्या मासिक उत्पन्नाची क्षमता ओळखून, अनेकजण उद्योजकीय स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रेरित होत आहेत, ज्यामुळे आर्थिक लैंगिक विषमता दूर होण्यास मदत होते. स्वातंत्र्य आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणारी लाडकी बहीण, ही योजना महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिकदृष्ट्या सक्षम भविष्यासाठी भक्कम पाया रचत आहे हे मात्र निश्चित.

# आयुर्वेद हा जगण्याचा सार : डॉ.केतकी पाटील

## डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालयात दिक्षारंभ सोहळा



**जळगाव – आयुर्वेदाला तीन हजार वर्षांची परंपरा लाभली आहे. आयुर्वेदात सगळ्यांचे मिश्रण आहे. एकूणच आयुर्वेदामध्ये जगण्याचा सार असल्याचे मत गोदावरी फाउंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील यांनी व्यक्त केले.**

गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय आणि रिसर्च सेंटरचा प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दिक्षारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, वैद्यकीय रूग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, होमीओपॅथी महाविद्यालयाचे डीन डॉ. राकेशकुमार मिश्रा, आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले, वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड आदी उपस्थित होते.



दिक्षारंभ सोहळ्याच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले यांनी महाविद्यालयाविषयीची माहिती उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना दिली. सोहळ्याच्या प्रमुख पाहुण्या डॉ. केतकी पाटील पुढे म्हणाल्या की, शिस्त हा गोदावरी परिवाराचा पाया आहे. त्यामुळे पालकांनी जो विश्वास आमच्यावर दाखवून त्यांच्या पाल्यांसाठी याठिकाणी प्रवेश घेतला आहे तो विश्वास नक्कीच सार्थ ठरेल. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला प्रत्येक विद्यार्थी वैदीक आणि वैद्यकीय आयुष्य जगतील. विद्यार्थ्यांनी पदवी घेऊन पुणे, मुंबईकडे न जाता जिथे खरी गरज आहे त्याठिकाणी वैद्यकीय सेवा द्या. आयुर्वेद ही सामाजिक सेवेची पदवी असून आयुर्वेदातच जगण्याचा सार असल्याचे डॉ. केतकी पाटील यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, वैद्यकीय रूग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, होमीओपॅथी महाविद्यालयाचे डीन डॉ. राकेशकुमार मिश्रा, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन प्रातिनीधीक स्वरूपात स्वागत करण्यात आले. सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. कोमल खांडरे व डॉ. पालवी चौधरी यांनी केले. तर डॉ. मयूरी चौधरी यांनी धन्वंतरी स्तवन म्हटले.

यांनी केले सहकार्य या सोहळ्यासाठी डॉ. मुकेश चौधरी, डॉ. सुवर्णा खंगार, डॉ. धनके, डॉ. मिनल किनगे, रजीस्ट्रार नितीन पाटील, चेतन चौधरी, मोहीत येवले, जमीर तडवी, हेमंत जंजाळकर, संजय परिस्कर, तेजस राणे, मनोज पाटील यांनी सहकार्य केले.

# डॉ.वर्षा पाटील वूमन्स कॉलेज महाविद्यालयात पंडित नेहरू जयंती साजरी

**जळगाव – गोदावरी फाउंडेशन संचलीत डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर ॲप्लिकेशन महाविद्यालयात पंडित नेहरू यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीलिमा वारके यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले..**

डॉ.नीलिमा वारके यांनी मार्गदर्शन करताना नेहरूंच्या नेतृत्वाखाली अनेक उच्च शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या आहेत. प्राचार्या डॉ.नीलिमा वारके यांनी नेहरूंच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांची आपल्या जीवनात अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले.सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# पांढरा कोट वैद्यकीय व्यवसायाचं प्रतीक : डॉ.आर्विकर

## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा व्हाइट कोट समारंभ उत्साहात



**जळगाव – डॉक्टर आणि नर्सिंग स्टाफच्या कोटचा रंग पांढरा असतो. याचा थेट संबंध रुग्ण आणि त्यांच्या सुरक्षिततेशी आहे.  हे वैद्यकीय व्यवसायाचं प्रतीक मानले जातं. शिवाय याचा संबंध रुग्ण आणि त्या स्वच्छतेशी आहे. तसेच पांढरा रंग लक्ष वेधून घेतो. रुग्णालय हे गर्दीच्या ठिकाणांपैकी एक आहे. रुग्णालयात गर्दीच्या वेळी रूग्णांनी खचाखच भरलेल्या रूग्णालयाच्या आवारात तुम्ही पांढरर्या रंगाचा कोट घातलेले डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी सहज ओळखू शकता. यामुळे डॉक्टरांच्या कोटसाठी पांढर्या रंगाचा वापर केला जात असल्याचे प्रतिपादन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकिय संचालक डॉ. एन.एस. आर्विकर यांनी आज येथे केले.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या ॲनाटॉमी विभागातर्फे एमबीबीएसच्या प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व्हाइट कोट समारंभ शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला.  डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून गेल्या वर्षापासून अशा प्रकारचा समारंभ घेण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

समारंभाच्या सुरूवातीला वैद्यकिय संचालक एन.एस. आर्विकर यांच्या हस्ते आरोग्य देवता धन्वंतरीचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी हृदयरोग तज्ञ डॉ. वैभव पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.कैलास वाघ, ॲनाटॉमी विभागाच्या समन्वयिका डॉ. शुभांगी घुले वाघ, डॉ. माया आर्विकर, डॉ. रंजना शिंगणे, डॉ. दिलीप ढेकळे, डॉ निलेश बेंडाळे, डॉ. निलीमा पाटील, डॉ.राशिका सक्सेना, डॉ प्रशांत गुडेटटी, डॉ. पारीतोष ठाकूर, डॉ. मोहम्मद अब्दूला, डॉ. भवानी वर्मा, डॉ.चंद्रया कांते,डॉ. सी.डी सारंग,डॉ. अनंत बेंडाळे, डॉ. विलास चव्हाण,रेक्टर सुरेंद्र गावंडे इ मान्यवर उपस्थित होते.

डॉ. एन.एस. आर्विकर यांनी पुढे बोलतांना सांगितले की, डॉक्टरांच्या पांढर्या रंगाच्या कोटचा संबंध रुग्णाच्या सुरक्षेसोबतही आहे. पांढर्या रंगाच्या कोटवर कोणत्याही प्रकारचे डाग सहज दिसतात. डॉक्टरांचं मूळ काम रुग्णावर उपचार करणे, हे असतं. डॉक्टर विविध रोगांची लागण झालेल्या रुग्णांना भेटून त्यांच्यावर उपचार करतात. डॉक्टरांना वेगवेगळ्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना भेटावं लागतं आणि अनेकवेळा जखमी रुग्णांवर उपचारही करावे लागतात. अशा वेळी डॉक्टरांचा विविध रोगांच्या विषाणूंसोबत संपर्क येतो. जेव्हा तुम्ही समाजात डॉक्टर म्हणून कार्य करू लागतात तेव्हा तुमची जबाबदारी वाढते. तसेच तुम्ही ज्या संस्थेतून शिक्षण घेतले त्या संस्थेचे तुम्ही प्रतिनीधीत्व करीत असतात. त्यामुळे  वैद्यकीय शैक्षणिक वर्षात अभ्यासासह अंतर्गत मुल्यांकन तुम्हाला गांभीर्याने घ्यावे लागणार आहे. आज तुम्हाला दिलेला हा व्हाइट कोट हा तुम्हाला तुमच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. या संस्थेत तुम्हाला खुप उज्वल भविष्य असल्याचेही डॉ.आर्विकर यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना व्हाइट कोट घालून गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्यावतीने मानसी राणे, सुनिध पानसे यांनी मनोगत व्यक्त केले. तर समारंभाचे सुत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन वैष्णवी वानखेडे, अमीत पाटील, राजनंदीनी पाटील, ऐश्वर्या लोकवानी, संस्कृती जाधव आणि पायल पाटील यांनी केले. याप्रसंगी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टर्स उपस्थीत होते.

### “वैद्यकिय प्रवेश हेच मोठे व्यासपिठ – प्रमोद भिरूड”

पालक व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे नियम व अभ्यासक्रमाबद्दल जबाबदारीची जाणीव करून देत आपला एमबीबीएसचा प्रवेश निश्चीत झाल्यानंतर हेच मोठे व्यासपिठ असून येत्या ५ वर्षात जिवापाड मेहनत घेवून एक निष्णात तज्ञ म्हणून तुम्ही बाहेर पडावे अशी तुम्या पालकांची इच्छा असते आणि त्यासाठी पालक खुप समर्पण करून हे स्वप्न रंगवत असल्याने त्यांच्या स्वप्नांना पुर्ण करणे ही तुमची जबाबदारी असल्याचे मत वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांनी व्यक्त केले.



### “देवानंतर डॉक्टरांनाच मानाचे स्थान – डॉ.प्रेमचंद पंडीत”

प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस हा त्यांच्या आयुष्यातील खुप मोठा दिवस आहे. विद्यार्थ्यांनी घातलेला हा व्हाइट कोट दिसायला सुंदर आहे, पण त्याची जबाबदारी तितकीच कठीण आहे. खुप घाव सहन केल्यावर जशी सुबक मुर्ती घडते तसेच हे वैद्यकीय शिक्षण आहे. खुप घाव सहन करावे लागतात, परिश्रम करावे लागतात आणि मगच आपण यशाचा पल्ला गाठु शकतो. देवानंतर डॉक्टरांनाच समाजात मानाचे स्थान असल्याचे मत वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत यांनी व्यक्त केले.



Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# पालकांच्या स्वप्नांना आकार द्या : डॉ.आर्विकर



**जळगाव – वैद्यकिय अभ्यासक्रमात समर्पित होवून अभ्यास केला तर ५ वर्षानंतर समाजात तज्ञ डॉक्टर म्हणून तुम्ही नावलौकीक मिळवावा असे अनेक पालकांचे स्वप्न असते आणि हे स्वप्न फक्त तुमच्या आणि तुमच्याच मेहनतीने पुर्ण होवू शकते त्यामूळे पुढील ५ वर्ष मेहनत आणि सचोटीच्या बळावर पालकांच्या स्वप्नांना आकार दया असे प्रतिपादन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकिय संचालक डॉ. एन.एस. आर्विकर यांनी आज येथे केले.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या ॲनाटॉमी विभागातर्फे एमबीबीएसच्या प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व पालक यांच्यासाठी पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते यात्रसंगी ते बोलत होते. यावेळी हृदयरोग तज्ञ डॉ. वैभव पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.कैलास वाघ, ॲनाटॉमी विभागाच्या समन्वयिका डॉ. शुभांगी घुले वाघ, डॉ. माया आर्विकर, डॉ. रंजना शिंगणे, डॉ. दिलीप ढेकळे, डॉ निलेश बेंडाळे, डॉ. निलीमा पाटील, डॉ.राशिका सक्सेना, डॉ प्रशांत गुडेटटी, डॉ. पारीतोष ठाकूर, डॉ. मोहम्मद अब्दूला, डॉ. भवानी वर्मा, डॉ.चंद्रया कांते,डॉ. सी.डी सारंग,डॉ. अनंत बेंडाळे, डॉ. विलास चव्हाण,रेक्टर सुरेंद्र गावंडे इ मान्यवर उपस्थित होते.

**वैद्यकिय प्रवेश हेच मोठे व्यासपिठ**

पालक व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे नियम व अभ्यासक्रमाबददल जबाबदारीची जाणीव करून देत मनापासून तयारी करण्याची जिदद बाळगा आणि नियमित सराव केल्यास एक यशस्वी वैद्यकिय तज्ञ म्हणून आपल्याकडे पाहीले जाईल पण विदयार्थ्यांसोबत पालकांच्या जबाबदारीची जाणीव करून देतांना पालकांनीही आपल्या पाल्याकडे लक्ष दिले पाहीजे असे मत वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांनी व्यक्त केले.

## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात
# बी एम्प्लॉयेबल कार्यशाळा संपन्न




**जळगाव – गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगाव येथे विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी दोन दिवसीय बी एम्प्लॉयेबल व्यक्तिमत्व व व्यावसायिक विकासावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.**

'प्राइम स्टेप' संस्थेच्या सहकार्याने नर्सिंग विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण तांत्रिक व सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षण देऊन रोजगारसंधी निर्माण करण्यासाठी व उद्योग क्षेत्रातील कौशल्यांचा तफावत दूर करण्यासाठी ही कार्यशाळा, घेण्यात आली होती.या कार्यशाळेत प्राइमस्टेपच्या मार्गदर्शन वरिष्ठ व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षक आकांक्षा सिंह यांनी केले. यामध्ये डिजिटल साक्षरता, आत्मविश्वास, भावनिक बुद्धिमत्ता, संवाद कौशल्ये, रिज्युम तयार करणे, तसेच मुलाखत तयारी या महत्त्वाच्या गोष्टींवर प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी सर्वसमावेशक पद्धतीने रचलेले होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यवसायिक कारकिर्दीची सुरुवात करण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात यशस्वी कारकिर्द घडविण्यासाठी योग्य दिशा देईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यशाळेत गोदावरी नर्सिंगचे विदयार्थी व प्राध्यापक सहभागी झाले.

# गोदावरी नर्सिंगच्या प्रा.अश्वीनी वैद्य यांचे राष्ट्रीय मानसिक आरोग्य पोस्टर स्पर्धेत यश



**जळगाव – गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्रा.अश्विनी वैद्य यांनी भारतीय मानसोपचार सोसायटीच्या कला आणि मानसोपचार कार्यगट आयोजित राष्ट्रीय मानसिक आरोग्य पोस्टर स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत यश प्राप्त केले आहे.**

जळगावच्या गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्रतिनिधित्व करताना मानसिक आरोग्य नर्सिंग विभागाच्या विभागप्रमुख प्रो. अश्विनी किशोर वैद्य यांच्यासोबत मानसिक आरोग्य नर्सिंगचे प्रथम वर्षाचे एम.एससी. नर्सिंग विद्यार्थी मि. मयुरी तिमांडे, मि. रोहिणी हरगे, आणि श्री. सूरज खवटे यांनीही भाग घेतला.दिनांक २७ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेल्या या स्पर्धेत त्यांनी तिसरा क्रमांक मिळवला.त्यांना भारतीय मानसोपचार सोसायटीकडून रु. १०००/- रोख रकमेचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मानसिक आरोग्य नर्सिंग क्षेत्रातील त्यांची समर्पण भावना आणि कौशल्य याचे हे द्योतक आहे. त्यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील,उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकी पाटील, हृदयरोग तज्ञ डॉ. वैभव पाटील, प्राचार्या विशाखा गनवीर, प्रशासकीय अधिकारी प्रवीण कोल्हे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात पं.नेहरू जयंती साजरी

जळगाव – गोदावरी फाउंडेशन संचलीत गोदावरी इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च जळगाव महाविद्यालयात पंडित नेहरू यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची आज १४ नोव्हेंबर रोजी १३४ वी जयंती आहे. बालदिनाच्या माध्यमातून संपूर्ण देश नेहरूंचे स्मरण करत आहे. यात्रसंगी डॉ. प्रशांत वारके यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बाल दिन म्हणून साजरी केली जाते. कारण त्यांना बालकांविषयी अतूट प्रेम होते. त्यांचे – भारत्ताच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक विकासात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान होते आज आपण त्यांच्या कार्याची माहिती घेऊन त्याप्रमाणे कृती करण्याची प्रतिज्ञा घेतल्यास हीच खरी त्यांना भावपूर्ण आदरांजली असेल असेही ते म्हणाले. सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात बालदिवस उत्साहात साजरा



**जळगाव – भारतीय संस्कृती विविधतेने सजली असून भावी वैद्यकिय तज्ञांनी हया संस्कृतीचे जतन करत असून १४ नोव्हे रोजी बालदिवस उत्सहात साजरा करण्यात आला.**

यावेळी बालरोग विभागात दाखल झालेले रूग्ण व त्यांच्या नातेवाईकासह बालरोग तज्ञ विभागप्रमुख डॉ. अनंत बेंडाळे,डॉ उमाकांत अणेकर,डॉ. सुयोग तन्नीरवार डॉ. भारती झोपे, डॉ. चंदाराणी, डॉ. ओमश्री गुडे,डॉ. कुशल धांडे, हिरामण लांडगे, यांचेसह बालरूग्ण व नातेवाईक मोठया उत्साहाने सहभागी झाले होते.

यावेळी बालरोग वार्डमध्ये फुग्यांची आकर्षक सजावट केली होती. विविध मनोरंजनाचे खेळ व गाणी देखिल लावण्यात आली तसेच बालरूग्णांना खाउ व भेटवस्तुचे वाटप करण्यात आले. यशस्वीतेसाठी बालरोग विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पो.अधिक्षकासह उमेदवारांनी घातले कार्तिक स्वामीना साकडे
## केरळी महिला ट्रस्टच्या कार्तिक स्वामी मंदिरात दोन दिवस भक्तांची मंदियाळी

**जळगाव – येथील निवृत्ती नगर मधील केरळी महिला ट्रस्टचे कार्तिक स्वामी मंदीर दि १५ रोजी खुले करण्यात आले व १६ नोव्हेंबर रोजी बंद करण्यात आले.यावेळी पो. अधिक्षक डॉ. महेश्वर रेडडी यांचे सह जळगाव शहर विधानसभेला उभ्या असलेल्या उमेदवारांनी भगवान कार्तिक स्वामींना विधीवत पूजा करून साकडे घातले.**



संपुर्ण केरळी पध्दतीने बांधलेले हे मंदीर गेल्या २५ वर्षापासून कार्तिकी पोर्णिमेनिमीत्त दर्शनासाठी खुले करण्यात येते. आकर्षक रोषणाई व मंडपाची सजावट करण्यात आलेली होती. पो. अधिक्षक डॉ. महेश्वर रेडडी यांनी जिल्हयात शांतता तर उमेदवारांनी विजयासाठी साकडे भगवान कार्तिक स्वामींना घातले.

या मंदिरात कार्तिकस्वामी व्यतिरीक्त नवग्रह व इतर देवतांची देखिल मंदीर असून ते वर्षभर दर्शनासाठी खुले असते. या मंदिरात दर्शनासाठी दरवर्षी भाविक दुरदेशातून मोठया प्रमाणात येत असतात. १५ नोव्हें रोजी अयप्पा स्वामी मंदिराचे दरवाजे सर्वसामान्याकरीता खुले करण्यात येउन विधीवत पूजा देखिल करण्यात आले. लाखो भाविकांनी अत्यंत शिस्तीत दर्शनाचा लाभ घेतला. याचवेळी अभिषेक करीत अनेक भावीकांनी नवस देखिल मागीतला. संस्थापक अध्यक्ष वासंती अयर यांचेसह सर्व केरळी बांधव यावेळी उपस्थीत होते.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक

प्रेरणा
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. *Commitment to commence daily disciplined actions propels you towards your goal.*

– ✻प्रतिदिन अनुशासित क्रियाओं को शुरू करने की प्रतिबद्धता आपको आपके लक्ष्य की ओर आगे बढ़ाती है।✻

2. *Sustaining change and achieving goals require patience and dedication.*

– ✻परिवर्तन को बनाए रखना और लक्ष्यों को प्राप्त करना धैर्य और समर्पण की मांग करता है।✻

3. *It's through unwavering determination that great achievements are realized.*

# गोदावरी अभियांत्रिकीत 'फ्रेशर्स कार्निवल' उत्साहात

**जळगाव – विद्यार्थ्यांना कॉलेजची तसंच सीनियर्सची ओळख व्हावी याच अनुषंगाने गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामध्ये फ्रेशर्स कार्निवलचे आयोजन केले होते.**

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. दीपक झांबरे (समन्वयक, तंत्रनिकेतन), डॉ. हेमंत इंगळे (अधिष्ठाता), डॉ.ईश्वर जाधव ( रजिस्ट्रार), डॉ .नितीन भोळे (प्रमुख,बेसिक सायन्सेस अँड हुम्यानिटी), प्रा. तुषार कोळी (यंत्र विभाग प्रमुख), प्रा. निलेश वाणी (संगणक विभाग प्रमुख), डॉ.अनिलकुमार विश्वकर्मा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स, विभाग प्रमुख), डॉ. विजयकुमार वानखेडे (ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर) महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून झाली.पुष्पगुच्छ देऊन



मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी त्यांची गुणवैशिष्ट्ये सादर करावी, जेणेकरून व्यक्तीमत्वात प्रगल्भता येईल. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून परस्पर संबंध व सर्वांगीण विकास वाढतो. सर्वांनी हिरीरीने सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा आनंद घ्या असे आवाहन केले. विद्यार्थ्यांचे सुप्तगुण, आत्मविश्वास तसेच त्यांमध्ये आपुलकीची भावना निर्माण व्हावी यासाठी विविध स्पर्धा वेगवेगळ्या राउंडचे आयोजन करण्यात आले होते. यात मुख्यत: पहील्या फेरी मध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या बाउल मधून चिठ्ठी काढून त्यात दिलेले टास्क पूर्ण करायचे होते . या फेरीत पहिल्या वर्षाच्या सर्व मुला- मुलींनी अतिशय आनंदाने सहभाग नोंदवला. यातून दुसऱ्या फेरीसाठी निवड झालेल्या विदयार्थ्यांना गेस द नेम इन द पेअर या टास्कच्या माध्यमातून बौध्दीक कौशल्य दाखवायचे होते.त्यानंतर अंतिम फेरी मध्ये निवडलेल्या विद्यार्थ्यांना त्यांना अवगत असलेली कला सादर करायची होती. शो युवर टॅलेंट या फेरीत विद्यार्थ्यांनी डान्स, सिंगींग मिमीक्री अश्या वेगवेगळ्या कला सादर केल्या. आणि या सर्व फेरीमधुन.मी.फ्रेशर्स म्हणुन सुमित पाटील व मीस फ्रेशस म्हणून अश्विनी ठाकरे हे विजेते ठरले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नीलाक्षी बर्डे, मानसी भगत, गणेश कोलते, तेजस पाटील, पल्लवी टाकले, नेहा पाटील, तेजस सूर्यवंशी, हर्षदा वारुळे, सागर कुवर, साक्षी उबाळे, मयूर कोळी, जान्हवी बोरसे, तुळजा महाजन, प्रणव थोरात, मोहिश नारखेडे व नूतन चौधरी या सर्व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.तसेच कार्यक्रमा वेळी परीक्षक म्हणून प्रा. हेमराज धांडे, प्रा.जयश्री पाटील, डॉ.ललिता पाटील, प्रा.तुषार कोळी यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थ्यांना , डॉ. नितीन भोळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे प्रथम वर्षाच्या सर्व प्राध्यापक वर्गाचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील (सचिव), डॉ. केतकी पाटील (सदस्य) व डॉ. वैभव पाटील (डीएम कार्डिओलॉजी) यांनी कार्यक्रमाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# डॉ. उल्हास पाटील महाविद्यालयात कौमी एकता सप्ताहास सुरूवात




**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात कौमी एकता सप्ताहास गुरूवारपासून प्रारंभ झाला.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या मायक्रोबायोलॉजी विभागातर्फे आयोजित एका कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते कौमी एकता सप्ताहास प्रारंभ करण्यात आला.

यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, डीन डॉ. प्रशांत सोळंके, मायक्रोबायोलॉजी विभागाचे डॉ. कैलास वाघ, डॉ. देवेंद्र चौधरी, डॉ. अनंत बेंडाळे, डॉ. शशांक जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. या सप्ताहांतर्गत वुमन्स डे, वेल्फेअर ऑफ मायनॉरिटी, लिंग्वेस्टीक हार्मोनी डे, विविध भाषा समानता दिवस, कन्सर्व्हेशन डे, कल्चर युनिटी डे असे विविध दिन साजरे केले जाणार आहे. संपूर्ण आठवडाभर या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# वझरखेडयात आरोग्याचा मंदीयाळी



**वझरखेडा – प्राथमिक आरोग्य केंद्र वझरखेडा ता भुसावळ येथे शिबिरातून आरोग्याची मंदियाळी आली. आज दि १८ रोजी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले.शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला.**

या आरोग्य शिबीरामध्ये डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाचे मेडीसिन तज्ञ डॉ. आसावरी, शल्यचिकीत्सा तज्ञ डॉ अपुर्वा गवई, नेत्ररोग तज्ञ डॉ. नरेंद्र यांनी नागरिकांची तपासणी केली. यात कान, नाक, घसा, पोटाचे विकार, मुतखड़ा, लहान मुलांचे आजार, डोळ्यांचे विकार स्त्रियांचे आजार, किडनी विकार, हाडांचे आजार हृदयरोग, दातांचे विकार तसेच लहान मुलाचे आजार अशा अनेक रोगांवर मोफत वैदयकिय निदान व उपचार योजनेअंतर्गत केले जाणार आहे. शिबिराचा ५६० रूग्णांनी लाभ घेतला.

# डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या संघास फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद

**नागपूर : ऑल इंडीया इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस नागपूर येथे ओपन फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या संघाने विजेते पद मिळवत यश प्राप्त केले आहे.**

हॅल्युसिया २४ या स्पर्धेत १० संघ सहभागी झाले होते. ३ ग्रुपच्या माध्यमातून ही स्पर्धा खेळवली गेली यात सेमीफायनलमध्ये जळगावने एम्स नागपूरचा तर यवतमाळने इंदिरा गांधी शासकिय महाविद्यालय नागपूरचा पराभव करीत अंतीम फेरी गाठली. डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव तसेच श्री वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय यवतमाळ यांचा थेट सामना होवून डॉ.उल्हास पाटील महाविद्यालयाने यवतमाळ संघाचा २ विरूध्द १ अश्या फरकाने पराभव करत विजेतेपद पटकावले. अमीत सुनिल साखरे याच्या नेतृत्वाखाली नझीफ मोहम्मद, पुथ्वीराज थोरात, हर्षवर्धन पवार, शिओम पाटील, चंदन मोरया, सुजल पवार, शुभम शिंपी, साहिल अडचित्रे, हर्षल पटले, सोहम लोखंडे, ताहा बोहरी, अभिषेक यळवंडे,यश पाटील, सोपान गोडे आणि प्रणव सुरडकर या खेळाडूनी सहभाग नोंदवला तर व्यवस्थापक किशन दुधानी आणि प्रशिक्षक सुरेंद्र गावंडे यांनी मार्गदर्शन केले. विजेत्या संघाचे आज अधिष्टाता डॉ प्रशांत सोळंके यांनी अभिनंदन केले.





# डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या संघास व्हॉलीबॉल स्पर्धेचे विजेतेपद

**नागपूर : ऑल इंडीया इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस नागपूर येथे ओपन व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या संघाने विजेते पद मिळवत यश प्राप्त केले आहे.**

हॅल्युसिया २४ या स्पर्धेत १२ संघ सहभागी झाले होते. ४ ग्रुपच्या माध्यमातून ही स्पर्धा खेळवली गेली यात सेमीफायनलमध्ये जळगावने एम्स नागपूरचा तर ` इंदिरा गांधी शासकिय महाविद्यालय नागपूरने जी एम्स बी । पराभव करीत अंतीम फेरी गाठली. डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव तसेच इंदिरा गांधी शासकिय महाविद्यालय नागपूर यांचा थेट सामना होवून डॉ.उल्हास पाटील महाविद्यालयाने नागपूरचा संघाचा २ विरूध्द १ अश्या फरकाने पराभव करत विजेतेपद पटकावले. चेतन पाटील कप्तान, सम्राटसिंग राजपूत, अभिषेक कोव्हाळ, रोहीत भोसले उपकप्तान,आशुंतोष मगर,आशिष शेळके, कल्पेश पाटील, ध्रुवसिंग, यशोगंध धिवसे या खेळाडूनी सहभाग नोंदवला प्रशिक्षक सुरेंद्र गावंडे यांनी मार्गदर्शन केले. विजेत्या संघाचे आज अधिष्टाता डॉ प्रशांत सोळंके यांनी अभिनंदन केले.

# जिल्ह्यात मतदान सुरळीत; मतदान यंत्रात नगण्य त्रुटी

**✻ मतदान केंद्रावरील टीमला प्रत्येक टप्प्यासाठी पाच वेळा मार्गदर्शक संदेश**

**✻ अकरा विधानसभेसाठी ११,७६२ ईव्हीएम त्यातील फक्त ७९ बदलावे लागले**

**✻ मतदार यादी अपडेटमुळे किरकोळ तक्रारी ; सी–व्हिझीलच्या २७५ तक्रारी निकाली**

**जळगाव – जिल्ह्यात निवडणूक यंत्रणेनी सूक्ष्म नियोजन केल्यामुळे मतदान सुरळीत पार पडले. जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदार संघात एकूण ११,७६२ बॅलेट युनिट वापरण्यात आले त्यातील फक्त्त ७९ यंत्र बदलावी लागली. मतदार यादी अपडेटमुळे यावेळी एकही तक्तार आली नाही अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली.**

**नियोजनासाठी ५ संदेश ठरले प्रभावी**

मतदान केंद्रावरील टीमला जिल्हा निवडणूक यंत्रणेकडून वेगवेगळ्या टप्पात पाच मेसेज देण्यात आले.

त्यातला पहिला संदेश सकाळी ९० मिनिटापूर्वी करायच्या कामाच्या सूचना त्यात मतदान प्रतिनिधीची नियुक्तीपत्र, त्यांची मूळ स्वाक्षरी व इपिकची खात्री करूनच त्यांना प्रवेश द्यावा. सकाळी ९० मिनिटच्या अगोदर बॅलेट युनिट जोडून ठेवावे. ९० मिनिटे अगोदर अभिरूप मतदान सुरु करावे. मतदान सुरु झाल्यानंतर करावयाच्या कामाच्या सूचना त्यात स्थलांतरीत व मयत मतदारांची यादीमध्ये नाव असलेल्या मतदाराची ओळख स्वतः मतदान केंद्राध्यक्ष यांनी करून घ्यावी. सायंकाळी ६ वाजता उपस्थित मतदारांना उलट्या क्रमाने चिठ्या द्याव्यात.

**मतदार यादी अपडेटमुळे नगण्य तक्रारी**

मतदार यादीत स्थलांतरीत आणि मयत यांचे नाव वगळून १ लाख ४३ हजार नवीन मतदाराची नोंद करण्यात आली. त्यामुळे फारशा तक्रारी आल्या नसल्याचे निवडणूक प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**मतदान केंद्रावर सुविधा**

मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अधिकाधिक सुविधा देण्यात आल्या होत्या. आरोग्याच्या सुविधेमुळे २५ ठिकाणी रुग्णावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

**अल्पबचत भवन मधील वेबकास्टिंगवरून नियंत्रण**

११ विधानसभा मतदार संघात एकूण ३६८३ मतदान केंद्र पैकी २९६५ मतदान केंद्रावर वेबकास्टिंग करण्यात आले, म्हणजे अर्ध्यापेक्षा अधिक मतदान केंद्रातून वेबकास्टिंग करण्यात आली. राज्यात सर्वाधिक वेबकास्टिंग जळगाव जिल्ह्यात करण्यात आली. याचे नियंत्रण अल्पबचत भवन मध्ये करण्यात आले. या ठिकाणी जिल्हानिवडणूक अधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, निवडणूक आयोगाच्या सामान्य निरीक्षक यांचे बारकाईने लक्ष देऊन त्रुटी दुर केल्या.

**सी व्हिजील अँपवरील तक्रारीचे निवारण**

या पवर एकूण २७५ तक्रारी प्राप्त झाल्या असून सर्व तक्रारी निकाली काढण्यात आल्या तर जिल्ह्यातील १९५० कॉल सेंटरवर ८७९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू झाल्यापासून आचारसंहिता भंगाशी संबंधित तक्रारी करण्यासाठी सी व्हिजिल अँप कार्यान्वित करण्यात आले होते. या प वर विविध प्रकारच्या आचारसंहिता भंगाशी संबंधित तक्रारी प्राप्त होत होत्या. जळगाव जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघातून एकूण २७५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या सर्व तक्रारी तात्काळ सोडविण्यात आल्या. सी व्हिजिल या पवर प्राप्त तक्रारींमध्ये चोपडा विधानसभा मतदारसंघातून ०४, रावेर विधानसभा मतदार संघातून ०१, भुसावळ विधानसभा मतदारसंघातून ०५, जळगांव शहर विधानसभा मतदार संघातून २१, जळगाव ग्रामीण मतदार संघातून ०४, अमळनेर मतदार संघातून १४, चाळीसगाव मतदार संघातून ७१, पाचोरा विधानसभा मतदारसंघातून ४९, जामनेर विधानसभा मतदारसंघातून १०, तर सर्वाधिक मुक्ताईनगर मतदारसंघातून ८९ अशा एकूण २६८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.